श्री सिध्दिविनायक

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.
दूरध्वनी : ०२२ – ६२४९ ११११ / ११२
ईमेल : admin@siddhivinayak.org I info@siddhivinayak.org
वेबसाईट : www.siddhivinayak.org

## प्रथम मुदतवाढ

दि. १०/०१/२०२६

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : मंदिरातील नैवेद्य बनविण्यासाठी, लागणारा किराणा माल (जिन्नस) पुरवठा करण्याकरीता कालावधी जानेवारी २०२६ ते मार्च २०२७**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात नैवेद्य बनविण्यासाठी लागणारा किराणा माल (जिन्नस) पुरवठा करण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वर्षभरासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात आली होती. परंतु दोनच पुरवठादाराने प्रतिसाद दिल्याने प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : | मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६, सांय. ५ वाजेपर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६, दु. २ वाजता |

अटी व शर्ती :

१) दरपत्रक भरण्यापूर्वी निविदेमध्ये नमूद किराणा मालाचे नमुने (जिन्नस) न्यासास सादर करणे आवश्यक राहिल. कडधान्य जिन्नस–प्रत्येकी १००ग्रॅम वजनानुसार कार्यालयात जमाकरून त्याची पोच घ्यावी. न्यासास सादर केलेल्या नमून्याप्रमाणे दरपत्रकधारकारास किराणा मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील. दरपत्रक भरण्यापुर्वी मालाचे नमूने न पुरविणाऱ्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

२) उत्तम व अस्सल दर्जाचा, किराणा मालाचा (जिन्नस) पुरवठा करणे, पुरवठादारावर बंधनकारक राहील. दुय्यम वा कमी दर्जाचा माल किंवा खराब किराणा माल स्विकारला जाणार नाही. अशा किराणा मालाचा पुरवठा केल्यास तो स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे आपणावर बंधनकारक राहील. अन्यथा किराणा मालाची नासधूस झाल्यास त्यासाठी न्यास जबाबदार राहणार नाही. खराब किराणा मालाची अदायगी केली जाणार नाही.

३) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून ३० किमी अंतरावर असणे आवश्यक आहे.

४) किराणा माल (जिन्नस) साहित्य न्यासाच्या खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करावयाचा आहे. त्यांचा वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

५) किराणा माल (जिन्नस) साहित्यांचा पुरवठा करण्याबाबतचे कार्यादेश प्राप्त झाल्यापासून २ दिवसात किराणा मालाचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. पुरवठा वेळेत न केल्यास किंवा खराब केल्यास पुरवठादाराच्या देयकातून २०% रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या किराणा माल संबधी न्यासास बिल सादर करताना बिलामध्ये पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बॅकेचा तपशील नमूद करणे आवश्यक राहील.

६) तांदूळ व गहु हा किराणा माल वगळून इतर किराणा माल प्रत्येकी १किलोच्या पॅकीग मध्ये असावा. किराणा मालाची (जिन्नस) दरमहा किंवा न्यासाच्या आवश्यकतेनुसार मागणी केली जाईल. एकदम सर्व माल घेतला जाणार नाही. मागणीनुसार माल स्विकारला जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेला माल स्विकारला जाणार नाही. मालाचे परिमाण अंदाजे असल्याने,प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल,याची पुरवठादाराने नोंद घ्यावी.

७) दरपत्रकधारकाने मोहोरबंद लिफाप्यात साक्षाकिंत करून खालील नमूद कागदपत्रे सादर करावी.

**लिफाफा – १**
अ) कंपनी नोंदणीचा दाखला
ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी
क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)
ड) ३ वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे
इ) मागील ३ वर्षाची सरासरी उलाढाल कमीत कमी ५ लक्ष असावी.

**लिफाफा – २**
अ) मुल्य दरपत्रक

८) दरपत्रकधारकाने लिफाफा देताना तांत्रिक दरपत्रक व मुल्य दरपत्रक तपशिल याप्रमाणे दोन वेगवेगळया **A4 आकाऱ्याच्या लिफाफामध्ये** भरुन त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक त्यावर लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

९) दरपत्रक सादर करतांना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्विकृत दर अखेर पर्यंत कायम राहतील. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

१०) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

११) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१२) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१३) किराणा माल (जिन्नस) साहित्यासंबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९११६० वर संपर्क साधावा.

१४) किराणा माल (जिन्नस) साहित्य पुरवठा कालावधी समाप्त झाल्यानंतरही, पुढील मोहरबंद दरपत्रके किंवा ई–निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू मान्य दरानुसार न्यासाच्या खरेदी विभागात किराणा माल (जिन्नस) साहित्यांचा पुरवठा पोहच करणे बंधनकारक राहील.

१५) महत्वाची सूचना– पुरवठादाराने पुरवठा करावयाच्या किराणा माल/वस्तुंच्या पॅकिंगवर (ब्रॅन्डेड नसलेल्या) पुरवठादाराचे नाव/तपशील असणे आवश्यक आहे. पॅकिंगवर नाव/तपशील नसलेल्या मालाचा/वस्तूंचा स्विकार करण्यात येणार नाही, याची विशेष नोंद घ्यावी.

१६) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

(मनाली सावंत)
वित्त व लेखा अधिकारी